B.A. F.Y. (New CBCS Pattern) Semester - I

# BA12A2-1 - Compulsory Marathi

P. Pages : 2 **GUG/S/23/10002N**

Time : Three Hours Max. Marks : 80

---

**1.** संस्कृतीच्या सर्व क्षेत्रातील नीतिमूल्यांची घसरण आणि माणसातील माणूसपण हरवत चालल्याची जाणीव लेखक पु.ल. देशपांडे यांना कशी व का झाली ते स्पष्ट करा. **16**

**किंवा**

सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे यांच्या सामाजिक कार्याचा वेध पाठाच्या आधारे घ्या.

**2.** बाबा आमटे यांनी तरूण पिढीला त्यांच्या बलस्थानांचा परिचय कसा करून दिला पाठाच्या आधारे आढावा घ्या. **16**

**किंवा**

बाजाचे व्यक्तिचित्र रेखाटा.

**3.** "वडिलांनी आपल्यावर केलेल्या अन्यायाची जाणीव त्यांना करून देत मुलगा - मुलगी असा भेद करणे योग्य नाही", असे अनुपमा उजगरे का म्हणतात? ते कवितेच्या आधारे स्पष्ट करा. **16**

**किंवा**

अष्टदारिद्रयात जीवन जगणाऱ्या स्त्रीने आपल्या मुलाच्या भविष्याबद्दलचा आशावाद 'लोन्याची माय' या कवितेतून कसा व्यक्त केला?

**4.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. **16**

**गट - क**

क) साहित्याचे चित्रपटात रूपांतर करताना दिग्दर्शकाला प्रामुख्याने कोणत्या तीन अवस्थांमधून जावे लागते?

ख) 'ममता तव ही पाहून माझ्या हृदया पाझर फुटले' असे कवयित्री लक्ष्मीबाई टिळक का म्हणतात?

ग) 'सामान्य माणसातील देवत्व जेव्हा जागृत होतं तेव्हा मोठमोठ्या सत्ता उलथून पडल्या आहेत,' असे कवी श्रीपाद जोशी का म्हणतात?

घ) 'नवा काळ' दैनिकानं क्रिकेटच्या क्षेत्रासाठी तयार केलेली परिभाषा लक्षात घ्यायला हवी, असे वि. वा. शिरवाडकर का म्हणतात?

**किंवा**

**गट - ख**

च) संत जनाबाई यांनी भक्तजनांचे हृदय व समर्पक चित्र कसे रंगवले आहे?

छ) संत तुकारामांनी आपल्या अभंगातून कोणता मौलिक संदेश दिला?

ज) चुकीच्या शब्दांसाठी कोणते नवे पर्याय वि. वा. शिरवाडकर यांनी दिले आहेत?

झ) चित्रपट ही एक कला आहे कसे ते साधार स्पष्ट करा.

**5.** पुढील सर्व प्रश्नांची थोडक्यात व समर्पक उत्तरे द्या. **16**

1) सदानंदचे व्यक्तिचित्र रेखाटा.

2) 'देवाचे आपल्या देशात जितके लाड केले जातात तितके इतरत्र कुठेही होत नसतील', असे पु. ल. देशपांडे का म्हणतात?

3) भाषेच्या प्रवाहीपणाबद्दल वि. वा. शिरवाडकर यांनी कोणत्या सूचना दिल्या?

4) पटकथेचे स्वरूप स्पष्ट करा.

**********